


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २८६ ●शुक्रवार,दि.१६ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955



# शिवछत्र परिवाराकडून सर्वसमावेशक नेतृत्वाला संधी

## उपनगराध्यक्षपदी विनोद मुळूक यांची वर्णी

**●नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष श्री विनोद मुळूक यांचे प्रसिद्ध पत्रक**

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषदेची निवडणूक आमदार विजयसिंह पंडित यांच्या खांद्यावर ऐनवेळी दिली गेली. कमी दिवसांमध्ये आमदार विजयसिंह पंडित आणि शिवछत्र परिवाराने सर्व समाजातील कार्यकर्त्यांना सोबत घेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व मित्र पक्षांची तगडी टीम बनवली. बीडच्या जनतेनेही त्यांना भरभरून आशीर्वाद दिले. त्यानंतर प्रत्येक घडामोडीत सर्वसमावेशक नेतृत्वाला आणि कार्यकर्त्याला संधी देण्याचे काम शिवछत्र परिवाराकडून होत असताना केवळ राजकीय सूडबुद्धीने शिवछत्र परिवार खोटे आरोप करणाऱ्यांचा आम्ही निषेध नोंदवत असल्याचे नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष विनोद मुळक यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

पुढे प्रसिद्धीत दिलेल्या पत्रकात नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष श्री विनोद मुळक यांनी म्हटले आहे की, शिवछत्र परिवार सर्वांना सोबत घेऊन चालणार आहे,म्हणूनच बीडच्या भीमकन्येला नगराध्यक्ष केलं, मुस्लिम समाजातील नेतृत्वाला गटनेतेपद दिलं, सामान्य घरातील मराठ्याच्या पोराला मला उपनगराध्यक्ष केलं आणि मुस्लिम समाजातील ज्येष्ठ मार्गदर्शक म्हणून मोईन मास्टर साहेब यांना 'स्वीकृत सदस्य' म्हणून संधी दिली. तसेच मारवाडी समाजातील व्यापारी क्षेत्रातील व सत्तेपासून वंचित असलेले दिनेश मुंदडा यांना संधी दिली. सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले व दलित-बहुजन चळवळीतील आणि पालिकेच्या कामकाजाचा अनुभव असलेले श्री. भीमराव वाघचौरे यांना स्वीकृत नगरसेवक केलं. म्हणून तुमच्या पोटात गोळा उठण्याचे कारण काय? असा सवालही उपस्थित करत काकासाहेब जोगदंड व अरुण बोंगाणे यांचा चांगलाच खरपूस समाचार प्रसिद्धी पत्रकातून घेतला आहे. पुढे पत्रकात म्हटले आहे की,ज्यांच्या सांगण्यावरून तुम्हाला आरोप करण्यास पुढे घातले त्यांनी तुमचे कसे हाल केले आहेत याचे आत्म परीक्षण एकदा करा, मग कळेल तुम्हाला.यापुढे शिवछत्र परिवारावर केलेले आरोप खपवून घेतले जाणार नाहीत असा कडक इशाराही नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष विनोद मुळक यांनी दिला आहे.



## राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा आज निकाल; कोण मिळवणार सत्ता, कोणाचा महापौर होणार?

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांसाठी काल मतदान पार पडलं. त्यानंतर आज निकाल जाहीर होणार आहे. सकाळी १० वाजतापासून सर्वत्र मतमोजणीला सुरुवात होईल. मुंबई वगळता राज्यातल्या इतर



सर्व महापालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग रचना आहे. बहुतांश प्रभाग हे ४ सदस्यीय असून काही प्रभाग ३ किंवा ५ सदस्यीय आहे. हाती आलेल्या आकडेवारीनुसार मुंबईत ५३ ते ५५ टक्के, ठाणे मनपात ५६ टक्के, पुणे मनपात ५२ टक्के, पिंपरी चिंचवडमध्ये ५८ टक्के, नवी मुंबईत ५७ टक्के, नाशिक मनपात ५७ टक्के मतदान झालंय. परभणीत ६६ टक्के, जालन्यात ६१ टक्के मतदान झालंय. आता ▶ उर्वरित पान २ वर

## बर्दापूर शिवारात भीषण आग; ऊसासह आंबा-जांभळाच्या झाडांचे मोठे नुकसान!



**बर्दापूर । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापुर व लिंबगाव शिवारात एकाच दिवशी दोन ठिकाणी शॉटसर्किटने उस जळून नुकसान झाल्याची घटना ता ( १४ ) रोजी दुपारच्या सुमारास बर्दापूर येथील ऊस जळाला तर सायकांळच्या सुमारास लिंबगाव येथे ऊस जळाला असल्याचे समोर आले असून ऊसासह तुषार संच जळाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. मिळालेली माहिती अशी कि बर्दापूर येथील शेतकरी सर्वोत्तम सुर्यकांत जोशी यांचे बर्दापूर ▶ उर्वरित पान २ वर



ॲड गोविंद शिराळे यांची नगरसेवक म्हणून नियुक्ती करण्यात आली यावेळी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना माजी नगरसेवक बाबुराव परळकर, संपादक दत्तात्रय नरनाळे,या प्रसंगी भापनेते नवनाथ आण्णा शिराळे, गोरख आबा शिराळे, सौ. रुक्मिणी शिराळे, सौ. मालन शिराळे आदी छायाचित्रात दिसत आहेत.

## जिल्हा युवा पुरस्कारासाठी १९ जानेवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक-युवतींमुळे समाजात युवाशक्तीची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. युवकांना मानव संसाधन विकासाचा प्रमुख स्रोत मानले जात असून विकास प्रक्रियेत त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. या अनुषंगाने राज्याच्या युवा धोरण २०१२ नुसार राज्य व जिल्हास्तरावर युवा पुरस्कार प्रदान करण्यात येतात. मुंबई शहर जिल्ह्यातील पात्र युवक, युवती व संस्थांनी २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीसाठी जिल्हा युवा पुरस्कारासाठी १९ जानेवारी २०२६ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन मुंबई शहराचे जिल्हा क्रीडा अधिकारी मार्क धरमाई यांनी केले आहे. पुरस्कारासाठीचे अर्ज भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुल, दुसरा मजला, जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई शहर कार्यालय, धारावी येथे सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती-जमाती, आदिवासी ▶ उर्वरित पान २ वर







## मुंबईत ४१ टक्के, कोल्हापुरी, मतदानात सर्वात भारी; राज्यातील २९ महापालिकांमध्ये कुठं, किती टक्के मतदान?



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील २९ महापालिका निवडणुकांसाठी दिवसभर उत्साहात मतदान झाले. मुंबई, पुण्यासह विविध जिल्ह्यात मतदार सकाळपासूनच मतदानासाठी बाहेर पडले होते. त्यामध्ये १०० पेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांनाही मतदानाचा हक्क बजावला, तर पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या झेन झी मतदारांनीही उत्साहात मतदान केले. मात्र, मुंबईसह महत्त्वाच्या शहरात मतदानाचा टक्का घसरल्याचं पाहायला मिळालं. मुंबईत दुपारी ३.३० वाजेपर्यंत ४१.०८ टक्के मतदान झाले असून मुंबईतील कुलाबा येथील वॉर्ड २२७ मध्ये दुपारी ३.३० पर्यंत फक्त १५.७३ टक्के मतदान झाले आहे. कदाचित हा राज्यातील सर्वात कमी मतदान झालेला वॉर्ड असू शकेल. दरम्यान, ५.३० वाजेपर्यंतची मतदानाची अंतिम आकडेवारी येण्यास आणखी वेळ लागू शकतो, त्यानंतर, अंतिम टक्केवारी अपडेट केली जाईल. राज्यात ९ वर्षानंतर झालेल्या महापालिका निवडणुकांसाठीच्या मतदानासाठी यंदा मतदानाचा टक्का घसरल्याचं दिसून येतं आहे. सोलापूर महापालिकेतही ▶ उर्वरित पान २ वर

## शेतकरी हक्क मोर्चाच्या दणक्याने तूर खरेदी केंद्र सुरु

### शेतकरी पुत्र व जिल्हा प्रशासनाची बैठक संपन्न !



**● सोयाबीन व कापूस खरेदीदरम्यान प्रतवारी च्या नावाखाली लुट केल्यास तात्काळ कारवाई , किमान आधारभूत किंमती पेक्षा कमी दरात शेतमाल खरेदी केल्यास परवाना रद्द होणार !**

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी हक्क मोर्चाच्या मागणीनुसार बीड जिल्हाधिकारी कार्यालयात कापूस, सोयाबीन व तूर खरेदी तसेच शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी संदर्भात महत्त्वपूर्ण प्रशासकीय बैठक पार पडली. ही बैठक अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उपनिबंधक, जिल्हा पणन अधिकारी व संबंधित विभागांच्या उपस्थितीत संपन्न झाली. शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने शेतकऱ्यांना खरेदी प्रक्रियेत भेडसावणाऱ्या अडचणी मांडत कापूस खरेदी केंद्र (उउख), सोयाबीन खरेदी केंद्र, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा साठा अधीक्षक अधिकारी तसेच सर्व खरेदी केंद्र चालकांची संयुक्त बैठक घेण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार ही बैठक संपन्न झाली. बैठकीदरम्यान शेतकरी पुत्रांनी सोयाबीन खरेदी केंद्रांवर ▶ उर्वरित पान २ वर




**जाहीर प्रगटन**

मी अलका रमेश केकान असे जाहीर प्रगटन देते की माझा व्यवहार श्री प्रेमचंद फुलचंद नवले राहणार शाहूनगर बीड यांच्यासोबत पीएम हाइट्स अपार्टमेंट मधील गाळा क्रमांक एक यास शहर भूमापन क्रमांक १४७३ असा मिळालेला आहे नगरपरिषद बीड वार्ड क्रमांक एक गट क्रमांक पाच मालमत्ता क्रमांक १-५-१४६९ असा मिळालेला आहे ज्याचे क्षेत्रफळ २२७.२५ चौरस फूट आहे म्हणजे २१.११ चौरस मीटर आहे आमचा व्यवहार हा ठरलेला आहे संपूर्ण कागदपत्राची पूर्तता करण्याची जबाबदारी ही श्रीमान प्रेमचंद फुलचंद नवले यांची राहील तसेच कोणालाही इतर व्यक्तीला या व्यवहाराबाबत कायदेशीर किंवा तोंडी काही आक्षेप असल्यास त्यांनी आठ दिवसात जाहीर प्रगटन देणारा संपर्क करावा अन्यथा कोणाचाही काही आक्षेप नाही असे समजून संबंधित व्यवहार हा पूर्ण केला जाईल व नंतर येणारा कुठलाही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

शिक्का

| जाहीर प्रगटन देणार | मार्फत, |
|---|---|
| सौ.अलका रमेश केकान | ॲड.दीपक गायकवाड |
| मोबाईल क्रमांक | मोबाईल क्रमांक |
| ९१५६०६८३१३ | ९८२२२९६९११ |

# सेवेतून भक्तीचा मार्ग 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या शहीदी समागम कार्यक्रमात सेवेच्या माध्यमातून साक्षीदार होवू या








भारतीय इतिहासात धर्म, मानवता, त्याग आणि बलिदान यांचे अद्वितीय प्रतीक म्हणून श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांचे नाव अजरामर आहे. धर्मस्वातंत्र्य, मानवमूल्ये आणि सत्यासाठी प्राणार्पण करणारे ते हिंद-दी-चादर म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या महान शहिदीच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड शहरात २४ व २५ जानेवारी रोजी एक भव्य, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हा भव्य समागम असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुमारे ५३ एकर विस्तीर्ण मैदानावर संपन्न होणार असून, देश-विदेशातून जवळपास १० लाखांहून अधिक भाविक या पवित्र समागम कार्यक्रमासाठी नांदेडमध्ये दाखल होणार आहेत. हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता आणि मानवतेचा महासंगम ठरणार आहे.

● नऊ समाजांचा ऐतिहासिक सहभाग

या ऐतिहासिक शहीदी समागमाचे आयोजन नऊ समाजांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. राज्य शासनाचा अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादूर साहिबजी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच सीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज या सर्व समाजांनी एकत्र येत एकतेचा आणि समतेचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. ही संयुक्त रचना स्वतःतच गुरूंच्या विचारांची जिवंत साक्ष आहे. सर्व धर्म समान, सर्व मानव समान हा संदेश या आयोजनातून ठळकपणे अधोरेखित होतो.

● मुख्य मंडप, अनवाणी चालण्याची परंपरा आणि श्रद्धेचा सन्मान

कार्यक्रम स्थळी उभारण्यात येणाऱ्या मुख्य मंडपात दोनही दिवस श्री गुरु ग्रंथसाहिब विराजमान राहणार आहे. गुरूंच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी येणारे सर्व भाविक, मान्यवर, पदाधिकारी व अतिथी कार्यक्रम स्थळी अनवाणी चालणार आहेत.

ही परंपरा केवळ धार्मिक शिस्त नसून अहंकार त्याग, नम्रता आणि गुरूचरणी समर्पणाची भावना व्यक्त करणारी आहे. लाखो भाविक अनवाणी चालत गुरूच्या दर्शनासाठी येणार, हे दृश्यच सेवेतून भक्तीचा खरा अर्थ उलगडून दाखवणारे ठरणार आहे.

तसेच संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या जन्म गाव नरसी नामदेव येथून वारकरी दिंड्या पायी चालत नांदेड येथे समागम स्थळी येणार आहे

● श्रमदानातून उभी राहणारी सेवा संस्कृती

या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा एक अत्यंत प्रेरणादायी प्रसंग म्हणजे नुकतेच पार पडलेले भव्य श्रमदान. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या उपस्थितीत कार्यक्रम स्थळी श्रमदान करण्यात आले. मैदानावरील खडे उचलणे, जमिनीची स्वच्छता करणे, चालण्यासाठी सुरक्षित व्यवस्था करणे ही सर्व कामे सेवाभावाने करण्यात आली.

प्रशासन, विद्यार्थी, स्वयंसेवक आणि भाविकांनी एकत्र येऊन केलेले हे श्रमदान सेवेतून भक्तीचा प्रत्यक्ष अनुभव देणारे ठरले. गुरूंच्या शिकवणीनुसार सेवा हीच खरी साधना असल्याचा संदेश या उपक्रमातून समाजापर्यंत पोहोचला.

● लंगर : समानतेचा आणि मानवतेचा महासागर

या भव्य शहीदी समागमात भाविकांच्या सोयीसाठी १२ भव्य लंगर उभारण्यात येणार आहेत. प्रत्येक लंगरमध्ये एकावेळी सुमारे ३,००० भाविक बसून भोजन करू शकतील, अशी उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. २४ व २५ जानेवारी रोजी हे लंगर सकाळी ८ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत अखंड सुरू राहणार आहेत.

लंगर म्हणजे केवळ अन्नसेवा नाही, तर समानतेची शिकवण आहे. येथे जात, धर्म, भाषा, देश, श्रीमंती-गरिबी यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वजण एकाच पंक्तीत बसून गुरूचा प्रसाद स्वीकारणार आहेत. हा दृश्य अनुभव गुरू नानक देवजींच्या सर्व मानव समान आहेत या विचाराचा साक्षात्कार घडवणारा असेल.

● विनामूल्य सेवा स्टॉल

कार्यक्रम स्थळाच्या चारही बाजूंनी दोन किलोमीटरपर्यंतच्या परिसरात चहा, पाणी, नाश्ता, फळे यांचे विनामूल्य सेवा स्टॉल उभारण्यात येणार आहेत. ही व्यवस्था लाखो भाविकांच्या सोयीसाठी असून, निःस्वार्थ सेवेचा सर्वोच्च आदर्श समाजासमोर ठेवणारी आहे. सेवा करताना कोणताही मोबदला, मान-सन्मान किंवा प्रसिद्धी अपेक्षित नसून, केवळ गुरूंच्या नावाने सेवा करण्याचा आनंद स्वयंसेवक अनुभवणार आहेत.

● जुताघर : नम्रतेचा आणि अहंकार त्यागाचा संस्कार

कार्यक्रम स्थळी ८ प्रवेशद्वारांवर ८ जुताघरे उभारण्यात येणार असून, गरजेनुसार त्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे. लाखो भाविकांच्या पादत्राणांची काळजी घेणे ही एक मोठी जबाबदारी असून, ती सेवा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडली जाणार आहे. जुताघर सेवा म्हणजे अहंकाराचा त्याग आणि नम्रतेची साधना. गुरूंच्या दरबारात प्रवेश करताना पादत्राणे बाहेर ठेवणे म्हणजे बाह्य वैभव आणि गर्व दारातच ठेवणे होय. ही सेवा माणसाला अंतर्मुख करते आणि समानतेचा खरा अर्थ शिकवते.

● गतका, परंपरा आणि शौर्याचे दर्शन

या शहीदी समागमात शीख धर्मीयांचा पारंपरिक युद्धकला प्रकार 'गतका' सादर करण्यात येणार आहे. यामध्ये पारंपरिक शस्त्रांचे प्रदर्शन, शौर्य, शिस्त आणि युद्धकलेचे प्रात्यक्षिक पाहायला मिळणार आहे. तसेच नऊ समाजांच्या वतीने पारंपरिक कीर्तन, कथा आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यातून गुरूंच्या जीवनकार्याचा आणि बलिदानाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे.

या सामगमासाठी दिल्ली अमृतसर, चंदीगड, मुंबई, हैद्राबाद येथून मोफत रेल्वे सेवा राहणार असून तसेच विशेष विमानसेवा दोन्ही दिवस असणार आहे. तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी दहा हजार भाविकांच्या निवासासाठी सर्व सुविधायुक्त आदर्श टेन्ट सिटी उभी करण्यात येणार आहेत

● हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी : श्रद्धेचा अभिषेक

या ऐतिहासिक कार्यक्रमात हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे.

गुरूंच्या प्रतिकृतीवर आणि भाविकांवर होणारी ही पुष्पवृष्टी म्हणजे श्रद्धेचा, सन्मानाचा आणि कृतज्ञतेचा अभिषेक असेल.

● सेवेतून इतिहासाचे साक्षीदार होवू या

नांदेड येथे होणारा हा ३५० वा शहीदी समागम म्हणजे केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता, बलिदान आणि मानवतेचा महासोहळा आहे. हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांचा संदेश आजही तितकाच जिवंत असून, तो या भव्य आयोजनातून संपूर्ण जगाला पुन्हा एकदा दिशा देणार आहे. तसेच या कार्यक्रमासाठी विविध राज्यांचे मुख्यमंत्री, बागेश्वरचे आचार्य , महंत आदी उपस्थित राहणार आहे.

चला तर मग, या गौरवशाली ऐतिहासिक कार्यक्रमाचे साक्षीदार बनू या, सेवेत सहभागी होऊ या आणि गुरूंच्या चरणी आपली सेवा अर्पण करण्यासाठी सज्ज होऊया.

**– अलका पाटील**
**उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड**

◆ पान ९ वरून पुढे...

## राज्यातील २९...

आज लागणाऱ्या महानिकालांची उत्सुकता आहे. राज्यातील २९ महापालिकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या प्रचंड फैरी झडल्यानंतर मतदारराजाने त्याचा कौल गुरुवारी 'ईव्हीएम' बंद केला. कोणत्या राजकीय पक्षांना आणि नेत्यांना हसण्याची संधी मिळते आणि कोणाला हादरे बसतात याचा फैसला शुक्रवारी सकाळी १० पासून सुरू होणाऱ्या मतमोजणीद्वारे होणार आहे. मुंबईच्या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले आहे. एकत्र आलेले ठाकरे बंधू महापालिकेवर झेंडा फडकविणार की भाजप-शिंदेसेना त्यांना धक्का देणार याबद्दल कमालीची उत्सुकता आहे.

## बर्दापूर शिवारात...

शिवार गट नं १२४१ मधील अंदाजे दोन एकर ऊस ता. १४ रोजी दुपारच्या सुमारास शेतामधून गेलेल्या थ्रिफेज लाईनवर स्पार्किंग होऊन थीनगी पडून जळाला असून जवळपासचे शेतकऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला मात्र तोपर्यंत ऊस जळाल्याने मोठे नुकसान झाले असल्याचे शेतकऱ्याने सांगीतले . तसेच लिंबगाव येथील शेतकरी इसाक हुसेन शेख व महमद हानिफ इसाक शेख या दोघांचा लिंबगाव शिवार गट नंबर ११२ व ११३ मधील ऊस तिन ते चार वाजणेच्या सुमारास डिपीचा डिओ जळून ठिणगी पडून उस व अंबे ,जांभळ असे झाडे तसेच तुषार संच जळून नुकसान झाल्याचे शेतकऱ्याकडून सांगण्यात आले असून घटनेची माहिती मिळताच जवळपासचे शेतकरी व ग्रामस्थांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला मात्र, तोपर्यंत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, या आगीत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. संबंधित विभागाने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## जिल्हा युवा...

भाग, तसेच शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, संस्कृती, कला, क्रीडा, विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योग, महिला सक्षमीकरण, स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंध, व्यसनमुक्ती आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक, युवती व संस्थांना जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी ९५९४३६९५६१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## मुंबईत ४१ टक्के...

मतदान टक्का घसरणार असल्याचे दिसून येते, ५२ ते ५५% मतदानाचा अंदाज व्यक्त होत आहे. सोलापुरात ३.३० वाजेपर्यंत ४०.३९ टक्के मतदान झाले आहे.

राज्यातील २९ महापालिकेमध्ये कुठं, किती मतदान?

बृहन्मुंबई महानगरपालिका : ४१.०८ टक्के
ठाणे : ४३.९६
कल्याण डोंबिवली : ३८.६९
नवी मुंबई- ४५.५१ टक्के
उल्हासनगर : ३४.८८
भिवंडी निझामपूर - ३८.२१
मिरा भाईंदर : ३८.३४
वसई विरार : ४५.७५
पनवेल : ४४.०४
नाशिक : ३९.६४
मालेगाव : ४६.१८
धुळे : ३६.४९
जळगाव : ३४.२७
अहिल्यानगर : ४८.४९
पुणे - ३६.९५ टक्के
पिंपरी चिंचवड - ४०.५० टक्के
सोलापूर : ४०.३९
कोल्हापूर : ५०.८५
सांगली मिरज-कुपवाड : ४१.७९
छ. संभाजीनगर : ४३.६७
नांदेड वाघाळा : ४२.४७
लातूर : ४३.५८
परभणी : ४९.१६
अमरावती : ४०.६२
अकोला : ४३.३५
नागपूर : ४१.२३
चंद्रपूर : ३८.१२
इचलकरंजी : ४६.२३
जालना : ४५.९४

## शेतकरी हक्क...

अनेक ठिकाणी हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी होत असल्याचे पुरावे सादर केले. तसेच उउख खरेदी केंद्रांवर प्रतवारीच्या नावाखाली शेतकऱ्यांची अडवणूक केली जात असल्याच्या तक्रारी मांडण्यात आल्या. यासोबतच शेतकऱ्यांची तात्काळ तूर खरेदी सुरू करण्यात यावी, अशी ठाम मागणी शेतकरी पुत्रांनी केली. यावर अप्पर जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तात्काळ तूर खरेदी केंद्र सुरू करण्यात येतील तसेच उद्यापासून तुरीच्या नोंदी घेतल्या जातील, असे स्पष्ट केले. बैठकीत बीड जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये शेतमालाची प्रतवारी ठरवण्यासाठी एकही ग्रेडरचे पद भरलेले नसल्याची गंभीर बाब समोर आली. आजपर्यंत शेतमालाची प्रतवारी व्यापाऱ्यांकडून ठरवली जात असल्याचे निदर्शनास आले. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रेडर पदे तात्काळ भरण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी आश्वासन दिले. तसेच बीड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवाराबाहेर मार्केट फीस वसुली केली जात होती ती तात्काळ थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहे या बैठकीत बीड जिल्ह्यातील शेतकरी, शेतकरी पुत्र व शेतकरी मित्रांची उल्लेखनीय एकजूट पाहायला मिळाली. या बैठकीस अप्पर जिल्हा दंडाधिकारी शिवकुमार स्वामी जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावर जिल्हा मार्केटिंग अधिकारी श्री भोसले व कापूस प्राधिकरण सीसीआय केंद्राचे केंद्रप्रमुख सोयाबीन खरेदी केंद्राचे केंद्रप्रमुख कृषी उत्पन्न बाजार समितीचे जिल्ह्यातील सर्व सचिव व विभागातील कर्मचारी उपस्थित होते शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोकराव येडे, कुलदीप करपे, डॉ. गणेश ढवळे, गणेश नाईकवाडे, बाळासाहेब मोरे, शेतकरी मार्गदर्शक कालिदास आपेट, शेतकरी नेते अजय बुरांडे, सामाजिक कार्यकर्त्या सुशिलाताई मोराळे, जे. डी. तांदळे सर, अर्जुन सोनवणे, सुहास जायभाय, ज्ञानेश्वर राऊत, संगमेश्वर आंधळकर, रामेश्वर गाडे राजू गायके, अभिषेक शिंदे ,राजवीर महेश डोंगरे अमोल पाठक राधाकिसन पटेकर मधुकर गाडी शेख युनूस सुदाम तांदळे आदी उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## नगराध्यक्ष यांचा...

सदस्यांची निवड प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे यांनी मनमानी करत स्वतःच्या पक्षाचे तीन सदस्य निवडून आणले. हा संपूर्ण प्रकार नियमबाह्य व घटनाबाह्य असल्याचे सांगत, याविरोधात आपण भाजप गटनेता म्हणून बीडचे जिल्हाधिकारी व राज्याच्या नगरविकास मंत्र्यांकडे तक्रार करणार असल्याचेही डॉ.क्षीरसागर यांनी सांगितले.

## शेतकरी कामगार...

कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करत साळुंखे यांचे अभिनंदन केले. त्यांनी पुढील कार्ययोजना जाहीर करताना संघटन मजबूत करणे, तरुण कार्यकर्त्यांना नेतृत्वात संधी देणे, शेतकरी-कामगारांच्या प्रश्नांवर आक्रमक पद्धतीने लढा देणे आणि जनजागृती मोहिमा राबवण्याचा निर्धार व्यक्त केला. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी मध्यवर्ती समितीचे सदस्य भाई विष्णुपंत घोलप होते प्रमुख उपस्थिती शेकापचे सहचिटणीस राज्याध्यक्ष भाई बाबासाहेब देवकर उमाकांत राठोड. राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य दिगंबर कांबळे, चंद्रकांत चव्हाण, भाई मोहन गुंड. मध्यवर्ती समिती सदस्य इम्रान शेख शिवाजी सुरवसे भाई अशोक रोडे सह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते , प वरिष्ठांनी मार्गदर्शन केले. शासन शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका करत, एकदिलाने संघटित लढ्याची गरज त्यांनी व्यक्त केली. ग्रामीण भागातील विकास, शेतमालाला हमीभाव, कामगारांच्या हक्कांचे संरक्षण आणि अन्य महत्त्वाच्या विषयांवर पक्षाने आवश्यक तेथे कठोर भूमिका घेण्याचा इशारा ही दिला. नवनिर्वाचित जिल्हा चिटणीस भाई बापूसाहेब साळुंके यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले, वरिष्ठांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी कधीच तडा जाऊ देणार नाही. शेतकरी हिताचे आंदोलन करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करीन. संघटन बळकट करणे आणि प्रश्न शासनापर्यंत पोहोचवणे ही माझी प्राथमिक जबाबदारी असेल. भाई बापूसाहेब सोळंके, ॲड नारायण गोले पाटील यांच्या निवडीने बीड जिल्ह्याला पक्ष वाढीसाठी काम उभं होईल, आशादायी चित्र निर्माण झाल्याने सर्वत्र स्वागत होत असून पक्ष संघटनेत नवचैतन्य निर्माण झाल्याची भावना सामान्य लोक चर्च करत आहेत.

## गेवराईचे गटशिक्षणाधिकारी...

त्यांनी शालेय गुणवत्ता वाढ, प्रशासनातील शिस्त, शिक्षक समन्वय तसेच विविध उपक्रम प्रभावीपणे राबवले आहेत. त्यामुळे त्यांच्या नियुक्तीमुळे शिक्षण विभागातील रखडलेली कामे मार्गी लागतील, शिक्षकांचे प्रश्न तातडीने सोडवले जातील आणि प्रशासनात पारदर्शकता येईल, असा विश्वास शिक्षक, पालक व नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. या नियुक्तीमुळे गेवराई तालुक्याच्या शिक्षण व्यवस्थेला दिलासा मिळाला असून आहे.

## आत्मविश्वास, नेतृत्व...

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. राहुल वांडरे यांनी केले. या उपक्रमाचे प्रमुख आकर्षण डॉ. अनिलकुमार गर्ग हे फिनको या कंपनीचे संस्थापक असून ते एक सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी व्याख्याते व सेल्स गुरु म्हणूनही प्रचलित आहेत. या कार्यक्रमात डॉ. गर्ग यांनी व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध पैलू उलगडून सांगितले. आत्मविश्वास वाढवणे, प्रभावी संवादकौशल्य, नेतृत्वगुण, तणाव नियंत्रण, सकारात्मक विचारसरणी, व्यावसायिक शिस्त, तसेच वैयक्तिक व व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्यांवर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.या एफडीपीमध्ये प्रत्यक्ष उदाहरणे, प्रेरणादायी कथा, संवादात्मक सत्रे व कृतीआधारित उपक्रम यांचा समावेश असल्याने सहभागींच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडवून आणण्यास कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. सदरील कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. गणेश वाघमारे यांनी केले. प्रस्तुत उपक्रमाची चित्रफित झलक संस्थेच्या समाज माध्यमावर प्रसिद्ध केलेली आहे.

## आ. प्रकाशदादा....

आली. इतिहास संशोधक व शस्त्रअभ्यासक श्री. रविंद्र भाऊसाहेब जगदाळे यांनी विद्यार्थ्यांना शिवकालीन युद्धनीती, शिस्त आणि स्वराज्याची प्रेरणा याबाबत सखोल माहिती दिली.या उपक्रमाचा मुख्य उद्देश तरुण पिढीमध्ये शौर्य, शिस्त, राष्ट्रप्रेम, सांस्कृतिक वारसा आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्सुकतेने शस्त्रांची माहिती घेतली तसेच अनेक शाळांनी शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना या प्रदर्शनास भेट देण्यासाठी पाठवले.या कार्यक्रमाचे उद्घाटन मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तसेच वाल्मिकि अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष मा. अनिलभाऊ नखाते यांच्या हस्ते झाले. यावेळी शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, पालक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. याच कार्यक्रमाअंतर्गत आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त भेटवस्तूऐवजी शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य देण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला नागरिक, संस्था, शिक्षक, पालक व व्यापाऱ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. या उपक्रमातून - ५०,००० वह्या (नोटबुक्स),मोठ्या प्रमाणावर पेन व पेन्सिली, फर्स्ट स्टेज बॉक्स (शालेय साहित्य संच) असे एकूण सुमारे १० लाख रुपये किमतीचे शैक्षणिक साहित्य स्नेहभेट मतदार संघातील सर्वसामान्य जनतेने दिले. हे साहित्य लवकरच ग्रामीण व गरजू विद्यार्थ्यांना विविध शाळांमार्फत वितरित करण्यात येणार आहे. वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा करून समाजासाठी काहीतरी देण्याची प्रेरणा मिळावी, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला असून, नागरिकांनीही या उपक्रमात सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपली. त्यामुळे हा उपक्रम केवळ उत्सव न राहता सामाजिक चळवळ ठरत असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकनेते सुंदर रावजी सोळंके सहकारी नागरी पतसंस्था, माजलगाव सहकारी मध्यवर्ती ग्राहक भांडार, सिंदफणा पब्लिक स्कूल, जिजामाता नर्सिंग अँड फिजिओथेरपी कॉलेज, सुंदर रावजी सोळंके महाविद्यालय,शिक्षक व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले तसेच कानिफनाथ विद्यालय मोहखेड,या सर्व संस्थांनी महत्त्वाची भूमिका निभावली. सर्व सहकार्यकर्त्यांचे व दानशूर नागरिकांचे आयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले.

## अंबाजोगाई नगरपरिषदेच्या...

मंजूर करण्यात आले. यावेळी लोकविकास महाआघाडीचे संख्याबळ पहाता उपनगराध्यक्षपदासाठी अन्य कोणाचाही उमेदवारी अर्ज न आल्याने दिनेश मोतीलाल भराडीया यांची अंबाजोगाई नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली असल्याचे यावेळी मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांच्याकडून जाहीर करण्यात आले. यावेळी लोकविकास महाआघाडीचे प्रमुख नगरसेवक राजकिशोर मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.विष्णुपंत सोळंके, डॉ.नरेंद्र काळे, विशाल जाजू, गटनेते सय्यद ताहेरभाई, नगरसेवक बबनराव लोमटे, ज्येष्ठ नगरसेवक हाजी इस्माईल हिरू गवळी, महेश बाळासाहेब कदम, महेश बालासाहेब लोमटे, ॲड.विकास रामकृष्ण काकडे, मालू भगवान जोगदंड, आकाश जिवनराव कराड, राजपाल संभाजी जावळे, नजीर उमरदराजखान पठाण, सौ. जयश्रीताई पृथ्वीराज साठे, सौ.दिपाताई बबन ऊर्फ दाजीसाहेब लोमटे, शेख शमीम शेख रहीम, बशीरा शफीक सय्यद, नाजनीन बेगम अकबरखाँ पठाण, शेख शिरीन अशफाक, सौ.श्रुतीताई अमोलराव लोमटे, सौ.संगिताताई दाजीसाहेब लोमटे, सौ.रेखाताई विलास जाधव, सौ.सोनीताई दत्तात्रय सरवदे हे लोकविकास महाआघाडीचे सर्व २० नगरसेवक आणि संकेत भैय्या मोदी, खालेदभाई चाऊस, रिपाइं नेते महेंद्र निकाळजे, भिमशक्तीचे भिमराव सरवदे, मनसे नेते सुनील जगताप, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाहुळे, युवा आंदोलनचे अशोक पालके, बेटी बचावचे धीमंत राष्ट्रपाल, राष्ट्रवादीचे कल्याण भिसे, अमित जाजू, शेख मुख्तार, सय्यद रशीदभाई, अमोल लोमटे, भिमसेन लोमटे, अकबरभाई पठाण, सचिन जाधव, ॲड.अनिल लोमटे, जफरभाई शेख, रौफभाई बिल्डर, जावेद गवळी, विशाल पोटभरे हे उपस्थित होते. यावेळी नगरसेवक राजकिशोर मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, डॉ.नरेंद्र काळे, ॲड.विष्णुपंत सोळंके, विशाल जाजू, गटनेते सय्यद ताहेरभाई, नगरसेवक बबनराव लोमटे, दिलीपराव काळे व सर्व नगरसेवकांनी नुतन उपनगराध्यक्ष दिनेश भराडीया यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या, व आगामी काळात अंबाजोगाई शहराच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पवनचक्की कंपनीचा शेतकऱ्यांच्या हक्कांवर घाला; खाजगी शेतजमिनीत बेकायदेशीर विद्युत पोल व लाईन

**● तात्काळ कायदेशीर कारवाईची मागणी : डॉ. गणेश ढवळे**



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरात पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कायदे, न्यायालयीन आदेश आणि शेतकऱ्यांचे मूलभूत हक्क अक्षरशः पायदळी तुडवत खाजगी शेतजमिनीत बेकायदेशीरपणे विद्युत पोल उभारून विद्युत लाईन टाकण्याचा उघड उघड मनमानी प्रकार केल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. कोणतीही लेखी परवानगी, संमती, पूर्वसूचना अथवा वैधानिक प्रक्रिया न करता थेट शेतजमिनीत घुसखोरी करण्यात आल्याचा गंभीर आरोप शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. सविस्तर माहिती अशी की, बीड तालुक्यातील मौजे लिंबागणेश येथील सर्व्हे नंबर १९७ मधील वडिलोपार्जित शेतजमीन डॉ. गणेश ढवळे यांच्या नावावर असून सदर जमीन त्यांच्या पूर्ण मालकी व प्रत्यक्ष कब्जात आहे. असे असतानाही टोरांटो पवनचक्की कंपनीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गावातील विद्युत पोल ओढण्याचे काम करणाऱ्या कंत्राटदारांना हाताशी धरून शेतकऱ्याला गृहीत धरत जबरदस्तीने शेतजमिनीत प्रवेश करून विद्युत पोल उभारले असून पुढील काळात विद्युत लाईन टाकण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा घाट घातला आहे. हा प्रकार म्हणजे थेट शेतकऱ्यांच्या मालकी हक्कांवर केलेला घाला असल्याचे डॉ. ढवळे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

सदर कृत्य हे भारतीय दंड संहिता कलम ४४१ व ४४७ अंतर्गत स्पष्टपणे फौजदारी स्वरूपाचा गुन्हा (Criminal Trespass) असून, जमिनमालकाची संमती नसताना खाजगी शेतजमिनीत प्रवेश करणे हा कायद्याचा उघड उघड अवमान आहे. तसेच विद्युत अधिनियम २००३ व Indian Telegraph Act, १८८५ मधील तरतुदींचा सर्रास भंग करून हा प्रकार करण्यात आला असून, संबंधित अधिकाऱ्यांनी कायद्याला जाणीवपूर्वक केराची टोपली दाखवली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या स्पष्ट निकालानुसार जमिनधारकाची संमती किंवा कायदेशीर परवानगीशिवाय खाजगी शेतजमिनीत विद्युत पोल व विद्युत लाईन उभारणे हे पूर्णतः बेकायदेशीर ठरते. असे असतानाही पवनचक्की कंपनीने न्यायालयीन आदेशांनाही हरताळ फासल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. शेतजमिनीत उभारण्यात आलेल्या विद्युत पोल व प्रस्तावित उच्चदाब विद्युत लाईनमुळे शेतीचे तुकडे पडत असून शेती उपयोगात गंभीर अडथळे निर्माण झाले आहेत. तसेच भविष्यात अपघात, जीवितहानी व मोठ्या आर्थिक नुकसानीचा धोका निर्माण झाला असून, यास संपूर्णपणे संबंधित पवनचक्की कंपनी जबाबदार राहील, असा ठाम इशारा डॉ. ढवळे यांनी दिला आहे. सदर बेकायदेशीर विद्युत पोल व लाईन तात्काळ हटवून इतरत्र स्थलांतरित न केल्यास, संबंधित पवनचक्की कंपनीचे अधिकारी, कर्मचारी तसेच परवानगी देणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करून न्यायालयीन लढा व तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट आणि कठोर इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला

# शालांत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत सीसीटीव्ही बसविण्यासाठी आर्थिक तरतुद करावी

## केंद्र संचालक व पर्यवेक्षक स्थलांतराचा अव्यवहार्य निर्णय रद्द करावा! मराठवाडा शिक्षक संघाची शालेय शिक्षण मंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी!

**बीड । प्रतिनिधी**

शालांत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही बसविण्यासाठी आर्थिक तरतुद करावी किंवा एमपीएस्सी,युपीएससी प्रमाणे सरकार अथवा बोर्डाने ती व्यवस्था करावी. या परीक्षेत केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांच्या स्थलांतराचा अव्यवहार्य निर्णय रद्द करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे शालेय शिक्षणमंत्री मा. ना. दादा भुसे यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हा सचिव गणेश आजबे यांनी याबाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत प्रत्येक दालनात सीसीटीव्ही बसविण्याचा आग्रह धरला आहे. परीक्षा संपन्न होताच सीसीटीव्ही फुटेज पेनड्राईव्ह मधे सादर करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी आर्थिक तरतुद मात्र करण्यात आलेली नाही. वेतनेतर अनुदान देण्यात सरकारने आखडता घेतलेला हात आणि कमी केलेले वेतनेतर अनुदान यामुळे कोणत्याही संस्था ताबडतोबीने एवढा मोठा खर्च करू शकत नाहीत. त्यामुळे सीसीटीव्ही बसविण्यासाठी सरकारने आर्थिक तरतुद करावी किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगाप्रमाणे ती व्यवस्था सरकारनेच करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पुढे निवेदनात म्हटले आहे की, केंद्र संचालक आणि पर्यवेक्षक स्थलांतराचा निर्णय देखील असाच अव्यवहार्य आहे. ज्या त्या शाळेचे शिक्षक तिथेच पर्यवेक्षक असल्याने सकाळ आणि दुपारच्या सत्रात शाळा भरवल्या जातात व अध्ययन व अध्यापन प्रक्रिया सुरू राहते. केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांचे स्थलांतर केल्याने परीक्षा कर्तव्यावरील शिक्षक शाळेला जावू शकत नाहीत परिणामी अध्ययन अध्यापन प्रक्रिया बाधित होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते.तद्वतच हा निर्णय शिक्षकांवर अविश्वास दाखवणारा देखील आहे. सरकारचा शिक्षकांवर विश्वासच नसेल तर सरकारने परीक्षा घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व सौ.के. एस.के. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा दि. ०८ जानेवारी ते १४ जानेवारी २०२६ या कालावधीत झोन व आंतरझोन क्रिकेट स्पर्धा शिदोड येथील कवठेकर क्रिकेट मैदान येथे खेळवण्यात आल्या. यामध्ये इंटरझोन स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजीनगर मधील देवगिरी महाविद्यालय, मौलाना आझाद महाविद्यालय, जालना येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, अॅड. बी.डी. हंबर्डे महाविद्यालय आष्टी आणि



सातत्याने मागील सतरा वर्षापासून इंटरझोन क्रिकेट स्पर्धेमध्ये खेळणारा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकमेव संघ सौ. के.एस.के. महाविद्यालय, बीड अशा एकूण पाच संघानी इंटरझोन स्पर्धेत सहभाग नोंदवला. यापैकी सौ. के. एस.के. महाविद्यालय, बीड आणि देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर या दोन संघामध्ये अंतिम सामना खेळवला गेला. अंतिम सामन्यामध्ये संभाजीनगर येथील देवगिरी महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले तर बीड येथील सौ. के.एस.के महाविद्यालयाला उपविजेते पदाचा बहुमान मिळाला.

या स्पर्धेचे बक्षिस वितरणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रभारी क्रीडा संचालक डॉ. सचिन देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. एस.एस.पाटील, पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर, देवगिरी महाविद्यालयाचे क्रिडा संचालक डॉ. शेखर शिरसट, महाविद्यालयाचे क्रिडा संचालक डॉ. भागचंद सानप, आयक्युएसी प्रमुख डॉ. सोनाजी गायकवाड इत्यादी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विद्यापीठाने नियुक्त केलेले पंच डॉ. शकील शेख, डॉ. ज्ञानेश्वर घोडके, प्रा. प्रियंका नवले, प्रा. अमृतसिंग बिसेन ठाकुर आदिंनी परीश्रम घेतले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शोषीत समाजाचे व स्त्रियांचे जिवनमान उंचावले आहे : प्रा. जयंत साठे



**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक कार्य करत असताना भारत देशामध्ये जो शोषीत समाज आहे त्यास स्वाभिमान देण्याचे कार्य केले. त्याला समाजामध्ये सन्मान मिळवून दिला. त्याचे जिवनमान उंचावण्यासाठी शिक्षणाचा मुलमंत्र दिला. त्याचप्रमाणे भारत देशातील स्त्री ही दलित शोषीत समाजाप्रमाणे दुर्लक्षीत होती ते देशाचे कायदामंत्री असताना हिंदु कोड बिल संसदेत सादर करुन स्त्रि स्वातंत्र्याचा जाहिरनामा देशापुढे मांडला. डॉ. बाबासाहेबांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता या मुलमंत्रावर आयुष्यभर काम केले. समाजातील अंधश्रध्दा, बेरोजगारी दुर करण्यासाठी कार्य केले. समाजातील अनिष्ठ रुढी जसे की, अस्पृश्यता, भेदाभेद मोडून काढण्यासाठी काळाराम मंदिर प्रवेश, महाडचा चवदार तळयाचा सत्यागृह असे महत्वाचे उपक्रम राबवले. विविध मागास जातीमध्ये समन्वय व जागृती निर्माण करण्यासाठी परिषदा घेतल्या व समाज जागृतीचे महत्वपुर्ण कार्य केले. असे प्रतिपादन प्रा. जयंत साठे यांनी सोशल सायन्स फोरम युनिट यांच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त व्याख्यान प्रसंगी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजिक विचार या विषयावर ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचा समारोप प्रसंगी उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे यांनी नामांतर चळवळीचा मागोवा घेतला. याकार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राहुल सोनवणे यांनी केले तर सुत्रसंचालन डॉ. पल्लवी इरलापल्ले यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. घोडके यादव यांनी केले.

# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात ऑलिंपिक वीर स्व. खाशाबा जाधव यांची जयंती राज्य क्रीडा दिन म्हणून साजरी



**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल, तेलगाव रोड, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय कुस्ती खेळाडू ऑलिंपिक वीर स्व. खाशाबा जाधव यांची जयंती राज्य क्रीडा दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे माजी अध्यक्ष कै. भाऊसाहेब जगताप यांचे पुतणे पुरुषोत्तम जगताप यांचे नुकतेच निधन झाल्याने त्यांच्या स्मृतीस आदरांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर ऑलिंपिक वीर स्व. खाशाबा जाधव व राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव (दादा) जाहेर पाटील, संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके, विद्यालयाचे प्र. मुख्याध्यापक के. बी. सोंडगे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक आर. टी. राऊत तसेच राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्रभारी प्राचार्या हिना मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेतील सहशिक्षक श्री. जगताप एस. सी. यांनी ऑलिंपिक वीर स्व. खाशाबा जाधव यांच्या जीवनचरित्रावर व क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीवर सविस्तर विचार मांडले. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# बाजीराव पाटील विद्यालयाचे चित्रकला परीक्षेत यश

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

तालुक्यातील जांब येथील बाजीराव पाटील विद्यालयाचे महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालय मुंबई यांच्या मार्फत एलिमेंटरी व इंटरमिजिएट या शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत ऑक्टोबर २०२५ मध्ये घेण्यात



आल्या होत्या या दोन्ही परीक्षेचा निकाल घोषित झाला असून या चित्रकला परीक्षेत बाजीराव पाटील विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे एलिमेंट्री परीक्षेला १७ व इंटरमिजिएट ११असे एकूण २८ विद्यार्थी प्रविष्ट होते सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले :शिवम म्हस्के हा विद्यार्थी अ ग्रेड प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाला आहे व संग्राम जायभाये हा विद्यार्थी ब श्रेणीत उत्तीर्ण झाला तर उर्वरित सर्व विद्यार्थी अनिकेत नागरगोजे,अनुष्का खंडागळे,आरती वाघमारे, ज्ञानेश्वरी नागरगोजे,गौरी खाडे,कोमल सातपुते क्षितिजा सोनसाळे,पल्लवी परजणे पायल खोपडे,राधिका गालफडे, रोहन सोनसाळे,सानिका गालफाडे, शुभ्रा खेडकर,वैष्णवी बांगर,अल्फीया शेख हिना शेख,इफत शेख,जोया पठाण पायल नागरगोजे,सारा शेख,सार्थक जायभाये,शैला सानप,या विद्यार्थ्यांना मिळाले विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री खाडे टीव्ही व चित्रकला शिक्षक जायभाये सर यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे व विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली आहे. विद्यालयाच्या या यशामुळे संस्थेचे सचिव श्री भागवत जिजा आघाव व संस्थेचे अध्यक्ष माजी प्राचार्य डॉ. दत्तात्रय आघाव साहेब व मार्गदर्शक पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रदीप आघाव साहेब विद्यालयाचे सह शिक्षक मिसाळ सर, मोरे सर,जामकर सर, सोनवणे सर, ढास सर,मस्के सर कराड सर, पठाण सर, खेडकर सर,भांगे सर,मोराळे मॅडम, मिसळ बी एस,ढोबळे ए.ए पवार.बी खेडकर.एस एच या सर्वांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# एसीईपी प्रस्तुत अल्ट्राटेक सिमेंट लि.चा वास्तु विषारद प्रशांत संचेती, बांधकाम व्यवसायिक संजय गायकवाड यांना पुरस्कार



**बीड । प्रतिनिधी**

एसीईपी छत्रपती संभाजीनगर प्रस्तुत अल्ट्राटेक सिमेंट लि. कंपनीच्यावतीने प्रति वर्षी मराठावाडास्तरीय उत्कृष्ट काँक्रीट स्ट्रक्चर पुरस्कार देण्यात येतो. २०२५-२०२६ साठीचा बीड येथील सुप्रसिध्द वास्तु विषारद प्रशांत संचेती आणि उत्कृष्ट कॉन्ट्रॅक्टर संजय गायकवाड यांना मिळाला आहे. सदरील पुरस्काराचे वितरण सोहळा दि.१३ जानेवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील हयात प्लेस या पंचतारांकीत हॉटेलमध्ये संपन्न झाला. उत्कृष्ट काँक्रीट स्ट्रक्चर पुरस्कार आणि उत्कृष्ट कॉन्ट्रॅक्टर पुरस्कार मिळाल्यामुळे बीड जिल्ह्याची मान उंचावली आहे. बीड येथील सुप्रसिध्द वास्तु विषारद तज्ञ प्रशांत संचेती हे गेल्या १६ वर्षापासून वास्तु विषारद क्षेत्रात कार्यरत आहेत. आज पर्यंत बीड शहरातील अनेक प्रतिष्ठीतांच्या वास्तुची निर्मिती देखील प्रशांत संचेती व संजय गायकवाड या जोडीने पुर्णात्वास नेली आहेत. बीड येथील नितीन सारडा यांच्या 'श्रृपाल निवास' या वास्तुची एसीईपी प्रस्तुत अल्ट्राटेक सिमेंट लि. कंपनीच्यावतीने 'ज्युरी' निर्देशितच्या अहवालाची दखल घेवून वास्तुचा एक उत्तम नमुना असल्याचे कंपनीच्यावतीने सांगण्यात आले.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती, एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १६/२०२६**
**गणेश विरूद्ध- निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **सुवर्णा महादेव चव्हाण** या दिनांक २६.११.२०१८ रोजी मौजे जातेगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

**अर्जदार- १) गणेश महादेव चव्हाण, वय २६ वर्षे धंदा- शेती, रा. जातेगाव ता. गेवराई जि. बीड. २) महादेव पि शेषेराव चव्हाण, वय ६० वर्षे धंदा- शेती, रा. जातेगाव ता. गेवराई जि. बीड.**

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हंत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे सुवर्णा महादेव चव्हाण रा. जातेगाव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : १८/०२/२०२६**
**(मार्फत अॅड धांडे एम.डी.)**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १३ / २०२६**
**अशोक विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **लक्ष्मण पि. धोडिबा यादव** हे या दिनांक २०.११.२०२४ रोजी मौजे सेलू ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

**अर्जदार- १) अशोक पि. लक्ष्मण यादव, वय ३७ वर्षे धंदा- शेती, रा.सेलू ता. गेवराई जि. बीड. २) बाबासाहेब पि. लक्ष्मण यादव वय ४४ वर्षे धंदा- शेती रा.सेलू ता. गेवराई जि. बीड.**

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीना मुंबई रेग्युलेशन ॲक्टने कलम २ प्रमाण वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणं असेल तर, या : पणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असंही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयन नामे लक्ष्मण पि. धोडिबा यादव रा. सेलू ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : १८/०२/२०२६**
**(मार्फत अॅड धांडे एम.डी.)**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश साहेब, (क-स्तर) न्यायालय शिरुर (का.), ता. शिरुर (का.) जि. बीड**
कि.दि.अर्ज क्र. ३२९/ २०२५

अर्जदार - **१. चाँदबी हसन सय्यद, वय ७८ वर्षे, धंदा सुखवस्तू, रा. फुलसांगवी, ता. शिरुर (का.) जि. बीड. २. करीम हसन सय्यद, वय ५३ वर्षे, धंदा नोकरी, रा. फुलसांगवी, ता. शिरुर (का.) जि. बीड. ३. अंबीर हसन सय्यद, वय ५० वर्षे, धंदा मजुरी, रा. फुलसांगवी, ता. शिरुर (का.) जि. बीड, ४. मैनाबी सिकंदर पठाण, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. सिरसमार्ग, ता. गेवराई जि. बीड, ५. खुर्शीदा हमीद सय्यद, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. ताकडगाव रस्ता, शारदा विद्या मंदीर जवळ, गेवराई ता. गेवराई जि. बीड, ६. सुमेर हमीद सय्यद, वय २९ वर्षे, धंदा नौकरी, रा. ताकडगाव रस्ता, शारदा विद्या मंदीर जवळ, गेवराई, ता. गेवराई जि. बीड, ७. साहिल हमीद सय्यद, वय २७ वर्षे, धंदा शिक्षण, रा. ताकडगाव रस्ता, शारदा विद्या मंदीर जवळ, गेवराई, ता. गेवराई जि. बीड**

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

अर्ज- मुंबई रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्यापेक्षा मयत नामे हसन हुसेन सय्यदए रा. फुलसांगवी, ता. शिरुर (का.) जि. बीड येथील रहिवाशी असून ते दिनांक २६/०६/२०१६ रोजी मौजे फुलसांगवी ता. शिरुर (का.) जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे आपत्ये व अर्जदार क्र. ५ ही मयताची सुन असून अर्जदार क्र. ६ व ७ हे मयताचे नातू आहेत. तसेच अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १५ /०१/२०२६ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी केले.

**पुढील तारीख ०६/०२ /२०२६**
**(अॅड. आर. व्ही. आव्हाड)**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर शिरूर का.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६ ● पान ४



ॲड. गोविंद नवनाथ आण्णा शिराळे यांची नगरसेवक म्हणून नियुक्ती झाल्यानंतर शुभेच्छा देताना शिराळे परिवार

## भाजपनेच मराठा समाजाला दिला न्याय, मात्र 'शिवछत्र'कडून अन्याय

### भाजपचे नेते काकासाहेब जोगदंड, अरुण बोंगाने यांचा आरोप

बीड । प्रतिनिधी

भाजपने नेहमीच मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका घेतली आहे. बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत स्वीकृत सदस्य पदाच्या नियुक्तीमध्ये मात्र 'शिवछत्र'कडून मराठा समाजावर अन्याय करण्यात आला आहे, असा आरोप भाजपचे नेते काकासाहेब जोगदंड, अरुण बोंगाने यांनी केला आहे. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले की, भाजपने कायम मराठा समाजाच्या हिताची भूमिका घेतली आहे. बीड नगरपरिषद निवडणुकीत भाजपने स्वीकृत सदस्य पदासाठी गोविंद शिराळे आणि रवी कदम या मराठा तरुणांना संधी देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र प्रत्यक्ष नियुक्ती करताना भाजपच्या रवी कदम यांच्यासारख्या युवक नेतृत्वावर अन्याय करत इतरांना स्वीकृत सदस्य पदी स्थान देण्यात आले. ही निवड प्रक्रिया पूर्णतः अन्यायकारक असून हा अन्याय 'शिवछत्र'कडून करण्यात आला आहे. या प्रकारामुळे मराठा समाजामध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. भाजपने मराठा समाजाला नेहमीच न्याय दिला आहे, मात्र या प्रकरणात मराठा युवक नेतृत्वावर अन्याय झाल्याची भावना समाजात असून आगामी निवडणुकांमध्ये याचा फटका बसेल, असा इशारा भाजपचे नेते काकासाहेब जोगदंड, अरुण बोंगाने यांनी दिला आहे.

# नगराध्यक्ष यांचा चुकीचा निर्णय आम्ही कोर्टात याचिका दाखल करणार : डॉ. सारिका क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेच्या पहिल्याच सभेत स्वीकृत सदस्यांच्या निवडीवर भाजपने आक्षेप घेतला आहे. नियमानुसार भाजपचे दोन, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा एक सदस्य निवडले जाणे अपेक्षित होते. नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे यांनी नियमांना बगल देत स्वतःच्या पक्षाचे तीन सदस्य निवडून आणल्याचा आरोप भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी केला आहे. या



प्रकाराविरोधात आपण बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

बीड नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी गुरुवारी (दि.१५) सभेचे आयोजन करण्यात आले होते. उपनगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून विनोद मुळूक यांनी अर्ज दाखल केला होता, तर भाजपकडून डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. मात्र, आमदार संदीप क्षीरसागर यांनी अजित पवार गटाला पाठिंबा दिला. त्यामुळे ठरलेल्या वेळेपूर्वी डॉ.क्षीरसागर यांनी आपला अर्ज माघारी घेतल्याने विनोद मुळूक यांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर स्वीकृत ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● नवनियुक्त स्वीकृत सदस्य गोविंद शिराळे यांचा सत्कार

गोविंद नवनाथ शिराळे यांची बीड नगर परिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, गटनेत्या डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी अभिनंदन केले. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, नागेश तांबारे, सय्यद मुस्तफा, बाळासाहेब गुजर, मंगेश धोंगडे, राहुल गुरखुदे, सनी माने, राकेश जाधव, नंदू पिंगळे, कपिल सोनवणे, मंगेश सानप, योगेश भागवत आदी उपस्थित होते.

## शेतकरी कामगार पक्षाच्या बीड जिल्हा पश्चिम विभाग चिटणीसपदी (प्रमुख) भाई बापूसाहेब साळुंके यांनी निवड

बीड । प्रतिनिधी

शेतकरी, कामगार आणि कष्टकरी समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा अधिवेशन माजलगाव येथे उत्साहात पार पडले. पक्षातील संघटनात्मक फेरबदल, नव्या जबाबदाऱ्यांचे वाटप आणि पुढील कार्ययोजनेची आखणी या पार्श्वभूमीवर हे अधिवेशन घेण्यात आला होत, बीड जिल्ह्यात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी झालेल्या चर्चेत पश्चिम जिल्हा चिटणीसपदी भाई



बापूसाहेब साळुंके तर पुर्व जिल्हा चिटणीसपदी ड नारायण गोले पाटील यांची जिल्हा संघटनक धनंजय मुळे खजिनदार भाई अशोक रोडे यांची एकमताने निवड करण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून अखिल भारतीय मराठा महासंघाच्या माध्यमातून बापूसाहेब साळुंके यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि संघटनात्मक कार्यात मोलाचे योगदान दिले मोठा जनसंपर्क आसनारे व्यक्ती आहेत, शेतकरी, कामगार, शेतमजूर व ग्रामीण भागातील समस्यांवर त्यांनी प्रभावीपणे आवाज उठवला असून त्यांच्या कार्याचा व्यापक अनुभव पाहता त्यांची निवड निश्चित करण्यात आली. निवड जाहीर होताच उपस्थित पदाधिकाऱ्यांनी आणि ▶▶ उर्वरित पान २ वर

● एकेकाळी सर्वाधिक विरोधी पक्ष नेता देणारा हा शेतकरी कामगार पक्ष मराठवाड्यामध्ये राज्यभर पाय रऊन होता मात्र थोडा काळ शेतकरी कामगार पक्षाचा स्थिर गतीने गेला बीड जिल्हा हा डाव्या पक्षाला मानणारा आहे त्यामुळे भविष्यामध्ये शेतकरी कामगार पक्ष संघटन मजबूत करून सर्वसामान्य शेतकरी कामगारांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेणार असल्याचे भाई मोहन गुंड राज्य चिटणीस मंडळ सदस्य शेकाप व्यक्त केले

## गेवराईचे गटशिक्षणाधिकारी म्हणून प्रविण काळम पाटील यांनी स्वीकारला पदभार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयात सुरू असलेल्या प्रशासकीय गोंधळाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. माजी गटशिक्षणाधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर मागील पंधरा दिवसांपासून रिक्त पदावर गेवराई तालुक्याचे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रविण काळम पाटील यांची गटशिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती केली. यानंतर प्रविण काळम पाटील यांनी गुरुवारी



गटशिक्षणाधिकारी पदाचा पदभार स्विकारला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी प्रविण काळम पाटील यांची गेवराईचे गटशिक्षणाधिकारी म्हणून बुधवारी आदेश निर्गमित केला. दरम्यान गुरुवार दि.१५ रोजी दुपारी प्रविण काळम पाटील यांनी अधिकृतपणे गटशिक्षणाधिकारी पदाचा पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक, शिक्षक संघटनांचे पदाधिकारी तसेच विविध शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी अनेकांनी पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत गेवराई तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेला योग्य दिशा देण्याची अपेक्षा व्यक्त केली. प्रविण काळम पाटील हे गेवराई तालुक्यातील शिक्षण विभागातील अनुभवी, शिस्तप्रिय व कार्यक्षम अधिकारी म्हणून ओळखले जातात. शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत असताना ▶▶ उर्वरित पान २ वर

## भाग्य बदलण्याची ताकत किसान बाबा व नवनाथ बाबा सारख्या संतात आहे: ह भ प कविराज महाराज झावरे

### हरिनामाने गोरक्षनाथ टेकडी येथे फुलला भक्तीचा मळा



बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत गुरुवर्य वैकुंठवासी किसन बाबा महाराज यांच्या हस्ते व गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये दिनांक १४ जानेवारी बुधवार रोजी द्वितीय कीर्तन रुपी सेवा ह भ प कविराज महाराज झावरे यांनी अर्पण केली

मनुष्याला आपले भाग्य बदलायचे असेल तर संत सेवा करणं ही काळाची गरज आहे संत सेवेमध्ये मनुष्याचे भाग्य बदलण्याची ताकद असते. संत संगतीमुळे जीवनाचे कल्याण होते. संताच्या संगतीत अर्धा क्षण जरी गेला तरी जीवनाचं कल्याण करण्याची ताकद संतामध्ये आहे. मनुष्याच्या आयुष्यात कितीही वाईट परिस्थिती येऊ द्या मनुष्याने संतांची संगती कधी सोडू नये भाग्य बदलण्याची ताकद गुरुवर्य वैकुंठवासी किसन बाबा महाराज व शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या सारख्या संतात आहे त्यामुळे मनुष्याने संत सेवा ही करत राहावी असे अभंग विवेचन ह भ प कविराज महाराज झावरे यांनी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताहामध्ये द्वितीय कीर्तन रुपी सेवा अर्पण करताना व्यक्त केले श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे हरी किर्तन प्रवचन गाथा भजन ज्ञानेश्वरी पारायण भावार्थरामायण हरीजागर काकडा भजन विष्णुसहस्रनाम अशा विविध खरीच नामस्मरणाच्या भक्तीमय कार्यक्रमाने श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे भक्तीचा मळा गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली फुलला आहे . श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे ह भ प कविराज महाराज झावरे यांच्या किर्तन सर्व वेळी टाळकरी माळकरी विणेकरी मृदुंगाचार्य भजनी मंडळी गायनाचार्य भाविक भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाले

## आत्मविश्वास, नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व घडवणारा प्रवास: गुरुकृपाचा दोन दिवसीय उत्कृष्ट उपक्रम संपन्न



माजलगाव । प्रतिनिधी

गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, माजलगाव यांच्या वतीने राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निम्मित १२ व १३ जानेवारी रोजी विद्यार्थी, प्राध्यापक तसेच सर्व कर्मचाऱ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास या विषयावर दोन दिवसीय अनोख्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्ते डॉ. अनिलकुमार गर्ग यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लाभली त्याच बरोबर गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले, आयुर्वेदचे प्राचार्य डॉ. प्रज्वल मस्के, फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. मकेश बाबू, फार्मसीचे प्राचार्य डॉ. अमित बिंदू , नर्सिंगच्या प्रा. पूनम खानापूरकर आदी मान्यवर उपस्थितीत होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रज्वल मस्के यांनी केले तद्नंतर डॉ. यशवंत राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांना सदरील दोन दिवसीय शिबिराचा आस्वाद घेण्यासाठी संबोधित केले. ▶▶ उर्वरित पान २ वर

## आ. प्रकाशदादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित शिवकालीन शस्त्रप्रदर्शनास अभूतपूर्व प्रतिसाद

### ५० हजार वह्या, पेन-पेन्सिल व प्रथमोपचार किटसह १० लाखांचे शैक्षणिक साहित्य भेट



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार आदरणीय प्रकाशदादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे आयोजित भव्य शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन व मर्दानी खेळ प्रात्यक्षिक कार्यक्रमास, विद्यार्थी, शिक्षक व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दोन दिवस चाललेल्या या उपक्रमाने संपूर्ण माजलगाव शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच आ.प्रकाश सोळंके यांनी पसायदान सेवा प्रकल्पास भेट देऊन अनाथ मुलांच्या सोबत आपला वाढदिवस साजरा केला आणि या मुलांच्या भविष्यासाठी एक लाख रुपये देणगी म्हणून दिले. तुळजाभवानी मर्दानी खेळ प्रशिक्षण व सांस्कृतिक सेवा संस्था, पुणे यांच्या माध्यमातून आयोजित या कार्यक्रमात शिवकालीन तलवारी, भाले, ढाल, कट्यार, धनुष्य- बाण यांसारख्या पारंपरिक शस्त्रांचे प्रदर्शन करण्यात आले. तसेच मर्दानी खेळांची थरारक प्रात्यक्षिके, युद्धकौशल्यांचे सादरीकरण आणि शिवकालीन इतिहासावर मार्गदर्शनपर व्याख्याने घेण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर

# अंबाजोगाई नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी लोकविकास महाआघाडीचे दिनेश भराडीया यांची बिनविरोध निवड

### स्विकृत नगरसेवकपदी लोकविकास महाआघाडीचे राजकिशोर मोदी व बबनराव लोमटे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई नगरपरिषदेमध्ये लोकविकास महाआघाडीच्या तिकिटावर व राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वाखाली सर्वाधिक २० नगरसेवक निवडून आले. या निवडून आलेल्या नगरसेवकांमधून अंबाजोगाई नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी दिनेश मोतीलाल भराडीया यांची तर स्विकृत नगरसेवक म्हणून राजकिशोर मोदी व बबनराव लोमटे बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. या निवडींमुळे लोकविकास महाआघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष व स्विकृत नगरसेवक यांच्यावर सर्वस्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

लोकविकास महाआघाडीचे गटनेते सय्यद ताहेरभाई, नगरसेवक महेश बालासाहेब लोमटे, नगरसेवक मालू भगवान



जोगदंड आणि नगरसेवक आकाश जिवनराव कराड यांच्यासह जाऊन गुरूवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी नगरसेवक दिनेश भराडीया यांनी लोकविकास महाआघाडीच्या वतीने उपनगराध्यक्षपदासाठी आपला उमेदवारी अर्ज मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांच्याकडे दाखल केला होता. त्यानंतर नगरपरिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत उपनगराध्यक्ष व स्विकृत सदस्य निवड करण्यासंदर्भात ठराव घेऊन ते ▶▶ उर्वरित पान २ वर

### सर्वांना सोबत घेऊन अंबाजोगाईचा विकास

लोक विकास महाआघाडीच्या नवनिर्वाचित सर्व २० नगरसेवकांनी एकत्रित येत सर्वानुमते नगरपरिषदेत महाआघाडीचा अधिकृत गट स्थापन केला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना लेखी पत्र देण्यात आले असून गट स्थापन करण्याबाबत व गटनेता निवडीचा ठराव व त्याबद्दलचे इतिवृत्त यापूर्वीच सादर करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वीच लोक विकास महाआघाडीच्या गटनेतेपदी सय्यद ताहेरभाई यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडपत्राच्या अनुषंगाने गट स्थापन करून गटनेता निवड केल्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम व संबंधित नियमानुसार या गटाची अधिकृत नोंद घेण्यात यावी, अशी विनंती पत्राद्वारे करण्यात आलेली आहे. त्यानंतर उपनगराध्यक्षपदासाठी दिनेश मोतीलाल भराडीया, स्विकृत नगरसेवकपदी माझी व आमचे सहकारी बबनराव लोमटे यांची बिनविरोध निवड झाली आहे. अंबाजोगाई शहरातील नागरिकांच्या सेवेसाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत. सर्वांना सोबत घेऊन सर्वांचा विकास हा आपला नेहमीचा मानक असून यासाठी पुढील जबाबदाऱ्या देताना सामाजिक अभिसरण व ज्येष्ठ व नव्या प्रतिनिधींची सांगड घालण्याचा आमचा विधायक प्रयत्न राहणार आहे. याच अभिसरण व समीकरणात माझे सहकारी दिनेश भराडीया यांची नगरपरिषद उपनगराध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.- राजकिशोर मोदी (प्रमुख, लोकविकास महाआघाडी, अंबाजोगाई.)